डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
शिक्षकर्वीय अधिका-यांना मराठी/ हिंदी भाषेचे
ज्ञान आवश्यक असल्याची मुळ सेवापुस्तकात
नोंद घेणेबाबत..

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

## कृषि नगर, अकोला – ४४४१०४ (महाराष्ट्र)

वाचा: १. विद्यापीठ परिपत्रक क्रमांक सु.आ.प्र.यो./से.पु.नोंदी/२०२४/१३२९ दिनांक २ ऑगस्ट, २०२४
२. विद्यापीठ आदेश क्रमांक बीईए/आस्था/मराठी-हिंदी/सुट/२०२४/१५४१ दिनांक २७ ऑगस्ट, २०२४

**परिपत्रक**

**क्र.बीबीए/शिक्षकर्वीय/मराठी-हिंदी/२०२४/1753** **दिनांक १२ सप्टेंबर, २०२४**

विद्यापीठातील अधिकारी/कर्मचारी यांना सेवांतर्गत विविध टप्प्यांवर पदोन्नती / कारकिर्द प्रगती योजना / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ई.सेवाविषयक लाभ प्रदान करतांना संगणक परिक्षा / मराठी, हिंदी भाषा परिक्षा, सेवाप्रवेशोत्तर परिक्षा, जातवैधता प्रमाणपत्राबाबत व स्थायीत्व प्रमाणपत्र ईत्यादी विषयी नोंदी अधिकारी / कर्मचाऱ्यांचे मुळ सेवापुस्तकांमध्ये घेणे आवश्यक आहेत. संदर्भिय परिपत्रक व आदेशान्वये अशा नोंदी घेण्याकरीता निर्देशीत करण्यात आले आहे.

या परिपत्रकाव्दारे असे स्पष्ट करण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय विद्यापीठ परिपत्रक व आदेश विद्यापीठातील शिक्षकवर्गीय अधिकारी / कर्मचा-यांना अनुज्ञेय राहील व त्याप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा नियम व वेळोवेळी निर्गमीत होणारे शासन निर्णयांमध्ये सुचित केल्याप्रमाणे योग्य त्या नोंदी अधिकारी /कर्मचाऱ्यांचे मुळ सेवापुस्तकामध्ये घेण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच उक्त प्रमाणे कार्यवाही करण्याची जबाबदारी संबधित कार्यालयाचे आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील याची नोंद घ्यावी.

सदर आदेश विद्यापीठाचे हितार्थ निर्गमीत करण्यात येत असुन त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

मा.कुलगुरूंचे मंजुरी व आदेशानुसार.

स्वा/-
कुलसचिव,
डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला.

**प्रतिलिपी माहिती व कार्यवाहीकरीता**
१.अधिष्ठाता, कृषि, / उद्यानविद्या डॉ.पंदेकृवि, अकोला.
२.अधिष्ठाता, कृषि अभियांत्रिकी, डॉ.पंदेकृवि, अकोला.

..२

क्र.बीबीए/शिक्षकर्वीय/मराठी-हिंदी/२०२४
दिनांक १२ सप्टेंबर, २०२४

३.संचालक, संशोधन / विस्तार शिक्षण, डॉ.पंदेकृवि, अकोला.
४.सहयोगी अधिष्ठाता, डॉ.पंदेकृवि (सर्व)------------------------------------------------.
५.विभाग प्रमुख, डॉ.पंदेकृवि, अकोला (सर्व)------------------------------------------------
६.प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र (सर्व)------------------------------------------------
७.कार्यालय प्रमुख, अ.भा.स.सं. प्र. (सर्व)------------------------------------------------.
८.नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / विद्यापीठ ग्रंथपाल, डॉ.पंदेकृवि, अकोला.
९.उपकुलसचिव, विद्याविषयक / सामान्य प्रशासन विभाग, डॉ.पंदेकृवि, अकोला.
१०. मा. कुलगुरूंचे स्विय सहायक यांना मा. कुलगुरू यांचे माहिती करीता सादर.
१०. वेतन व लेखाधिकारी अकोला / नागपुर
११. प्रभारी अधिकारी, विद्यापीठ संगणक कक्ष, अकोला यांना विद्यापीठाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.
१२ह. सहायक कुलसचिव (सर्व) ------------------------------------------------

उपकुलसचिव (आस्था)
डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला.

Officer In Charge, Agricultural Research System, Dr. P.D.K.V. Akola
Inward No. 342
Dt. 13/9/2024

(order m20) 72